# सोशल मीडिया: एक सामाजिक चिंता !




## समाजबदलाची एकलकोंडी!

राज्यभरातून जमलेले हजारो विवाहेच्छू व त्यांच्या नातलगांचा परवा नाशिकमध्ये प्रचंड हिरमोड झाला. जिल्हा परिषदेतर्फे आयोजित एकल महिला पुनर्विवाह परिचय मेळाव्यासाठी ही गर्दी उसळली. त्यांना आवरण्यासाठी चक्क पोलिसांना बोलवावे लागले. या मेळाव्यासाठी आठ हजारांहून अधिक विवाहेच्छूंनी नोंदणी केली; परंतु एकल महिलांच्या अल्प प्रतिसादामुळे हा कार्यक्रम आधीच रद्द केल्याची घोषणा करूनही उपवर व त्यांच्या वृद्ध नातलगांची झुंबड उडाली. छत्रपती संभाजीनगर, पुणे, नागपूर आदी ठिकाणचे लोक होतेच; परंतु शेजारच्या गुजरात व मध्य प्रदेशातील मराठी उपवरांची संख्याही लक्षणीय होती, हे विशेष.


जिल्हा परिषदेने विवाह जुळविण्याच्या फंदात पडावे का, हा कदाचित वादाचा मुद्दा ठरू शकतो. परंतु, निष्ठुर, असंवेदनशील म्हटल्या जाणाऱ्या व्यवस्थेतील एखादा सरकारी विभाग वा कोणी अधिकारी शिरस्ता सोडून सामाजिक समस्यांना भिडू पाहत असेल, समाज बदलासाठी धडपडत असेल तर या अभियानाचे कौतुक व स्वागतच करायला हवे. तरुणांच्या विवाहांचा खोळंबा आणि एकल महिलांच्या सबलीकरणाचा ज्वलंत प्रश्न यानिमित्ताने ऐरणीवर आला, हे महत्त्वाचे. काही दिवसांपूर्वीच झालेल्या सर्वेक्षणात जिल्ह्यात सुमारे ९५ हजार एकल महिला आढळल्या. प्रामुख्याने विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, प्रौढ कुमारिकांचा या संकल्पनेत समावेश होतो. अशा स्त्रियांची तेरा हजार मुले असून, त्यांचे संगोपन व शिक्षणाचे प्रश्नही समोर आले.

जिल्ह्यात लाखाच्या आसपास एकल महिला असूनही पुनर्विवाह परिचय मेळाव्यासाठी अवघ्या ९५ महिलांनी नोंदणी करणे, हे तसे धक्कादायकच. परंतु, किमान एवढ्या महिलांनी तरी पुनर्विवाहाची तयारी दाखवली, हेही नसे थोडके. शेजारील अहिल्यानगरमध्येही आशासेविकांच्या माध्यमातून घरोघरी झालेल्या पाहणीत लाखभर एकल महिला आढळल्या. पुरुषप्रधान व्यवस्थेत कुटुंब-नातलगांचा दबाव, मुलांचे संगोपन वा नव्या साथीदाराकडून त्यांचा स्वीकार होईल का, या काळजीपोटी महिला पुढे येण्यास धजावत नसतील. कदाचित पुनर्विवाहाची इच्छा स्वतःहून प्रदर्शित केल्यावर समोरून येणाऱ्या प्रतिक्रियेची भीतीही त्यांना वाटत असावी. एका बाजूला वय उलटले तरी लग्न जमत नसलेल्या तरुणांची वाढती संख्या, तर दुसरीकडे साथीदार गमावल्यानंतर किंवा घटस्फोटानंतर एकट्याने आयुष्य कंठणाऱ्या महिलांचे वाढते प्रमाण, हा मोठाच विरोधाभास. अशा सामाजिक प्रश्नांची गुंतागुंत परवडणारी नाही.

काही संस्थांच्या अंदाजानुसार, राज्यात सर्व जिल्ह्यांत मिळून एकल महिलांची संख्या वीस लाखांपेक्षा अधिक असावी. विशेषत: करोना संसर्गात घरातील कर्ता पुरुष गमावल्यानंतर अशा महिलांची संख्या वाढल्याचे दिसते. शहरालगतच्या काही ठरावीक तालुक्यांत या महिला स्थिरावल्याचेही आढळले. औद्योगिक क्षेत्रे, नोकरीच्या संधी, शहरांचे समीपत्व, ठरावीक भागात स्थलांतर आदी काही कारणे त्यामागे आहेत.

एकल महिलांच्या प्रश्नांवर राज्यभरात अधिक सर्वेक्षणे आणि खोलात जाऊन नेमकेपणाने अभ्यास होण्याची नितांत आवश्यकता आहे. परंतु, उठता-बसता महिला व बालकल्याणाचा जप करूनही दुर्दैवाने त्यांच्यासाठी तेवढ्या गांभीर्याने प्रयत्न होत नाहीत. महिलांचे विषय संवेदनशीलपणे हाताळले जात नाहीत. त्यांच्या सुरक्षेबाबत निष्काळजी दाखवली जाते. राज्यकर्त्यांकडून या मतपेढीचा स्वार्थासाठी वापर होत असला, तरी प्रत्यक्षात योजनांचे लाभ त्यांच्यापर्यंत पोचतच नाहीत.

ग्रामीण भागात जागरूकतेच्या अभावामुळे असंख्य महिला पेन्शन व इतर योजनांपासून वंचित राहतात. दाखले, कागदपत्रांच्या अपूर्ततेसह इतरही तांत्रिक जंत्रीत त्यांची होरपळ होते. वारंवार खेटे घालून अनेक जणी सवलतींचा नाद सोडून देतात. ब्रिटिशांनी पावणेदोनशे वर्षांपूर्वी महिला पुनर्विवाहाचा कायदा अमलात आणला. परंतु, इतक्या वर्षांनंतरही अद्याप समाजाने तशी मानसिकता न दाखवणे, हे दुर्दैवी व मोठेच सामाजिक अपयश. महिला पुनर्विवाहाच्या चाचपणीचा हा प्रयोग वरकरणी फसल्याचे दिसत असले, तरी एखाद्या सरकारी विभागाने दाखवलेली ही वाट सामाजिक प्रश्नांची तड लावून खऱ्या अर्थाने राज्याला पुरोगामित्वाकडे नेणारी आहे, हे विसरता कामा नये.




**ना जाने जिंदगी का ये कैसा दौर हैं ।**
**घर खामोश है और ऑनलाईन शोर हैं।।**

मागील आठवड्यात दोन महत्त्वपूर्ण बातम्यांनी सुज्ञ नागरिकांचे लक्ष वेधले आहे. यामध्ये दिनांक १० डिसेंबर २०२५ पासून ऑस्ट्रेलियात एक नवीन कायदा अमलात आल्याची बातमी आहे. त्यानुसार १६ वर्षाखालील असणार्या मुलांना सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अकाऊंट ठेवणे किंवा नवीन अकाउंट तयार करणे, यास बंदी करण्यात आली आहे. तर दुसरी बातमी ऐनवेळी लग्न तुटणे या प्रकारात इंदोर शहरात मागील ४० दिवसात १५० पेक्षा अधिक लग्न ऐनवेळी तुटल्याचे नमूद आहे. या दोन बातम्यांनी समाजातील सुज्ञ नागरिकांचे लक्ष सोशल मीडियाचे दुष्परिणामाकडे वेधले असून सोशल मीडिया शाप की वरदान? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

ऑस्ट्रेलियामध्ये सोशल मीडिया मिनिमम ऐज ॲक्ट या कायद्यानुसार १६ वर्षाखालील मुलांना सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर बंदी करण्यात आली आहे. ऑस्ट्रेलियाचा हा कायदा जगात पहिलाच असा मोठा निर्णय आहे. ऑस्ट्रेलिया सरकारने हा निर्णय घेतांना म्हटले आहे की, ही बंदी मुलांच्या मानसिक आरोग्य, सुरक्षितता व समग्र विकासासाठी महत्त्वाची आहे. कारण सोशल मीडियामुळे, सोशल प्रेशर, सायबर बुलिंग, आत्मछबी, बॉडी इमेज सोबतच इतर ऑनलाइन धोक्यांमुळे मुलांवर दूषित परिणाम होऊ शकतो. तसेच या उपायाने पालकांना त्यांच्या मुलांचा डिजिटल वापर नियंत्रित करणे सोपे होईल. हा कायदा काही प्लॅटफॉर्म्स ठरवूनच लागू होईल. म्हणजे शिक्षण, आरोग्य, मेसेज गेमिंग अशा सेवांवर कदाचित हा कायदा लागू होणार नाही.

लहान मुलांना सोशल मीडियावर बंदी या निर्णयाचे फायदे सांगताना लहान मुलांचा ऑनलाइन छळ, धमक्या, ट्रोलिंग, नाव ठेवणे, यापासून लहान मुलांना संरक्षण मिळते. तसेच मानसिक ताण आणि चिंता कमी होण्यास मदत होते. लहान मुलांच्या मानसिक आरोग्यावर सकारात्मक परिणाम होईल. सोशल मीडियामुळे निर्माण होणारी तुलना, दबाव कमी होईल. शरीर दोषाबद्दल निर्माण होणारी असुरक्षितता कमी होईल. सोशल मीडियावर वेळ वाया जाणे कमी होऊन, अभ्यासावर अधिक लक्ष देता येईल. तसेच हिंसा, व्यसन, प्रौढ सामग्री, चुकीची माहिती अशा गोष्टींपासून मुलांचा बचाव होईल. रात्री उशिरापर्यंत स्क्रोलिंग गेमिंग रिल्स यामुळे होणारा झोपेचा त्रास कमी होईल. वास्तविक जगात ऑफलाईन संवाद आणि खेळांकडे वाटचाल होईल. मुलांचे वैयक्तिक डेटा गोळा करून त्याचा व्यावसायिक वापराचा धोका कमी होईल.

– डॉ.राजेश राजोरे
मो.नं. : ९८२२५९३९०३
खामगाव, जि. बुलडाणा.

या निर्णयाने होणारे तोटे काही लोकांनी चर्चेत आणले आहे. त्यामध्ये मुलांना स्वतःचे विचार मांडण्यासाठी असलेले एक मोठे माध्यम बंद होणे, खोटे वय टाकून अकाऊंट तयार करणे सोपे होणे, त्यामुळे बंदी प्रभावी न ठरण्याचा धोका असणे, मोठ्या मुलांना हे नियंत्रण जड होणे, त्यामुळे घरात मतभेद वाढणे, असे तोटे चर्चेत आले आहे. दुस-या बहुचर्चित बातमीकडे जर बघितलं तर एकट्या इंदोर शहरात ४० दिवसांमध्ये १५० पेक्षा अधिक लग्न ऐनवेळी तुटले. त्यामध्ये सोशल मीडिया हे प्रमुख कारण असल्याचे सर्व्हेमधून बाहेर आले. सोशल मीडियाच्या माध्यमातून जुन्या पोस्ट बाहेर येणे, त्यांची जुनी मैत्री बाहेर येणे, कोणाचे राहणे, फिरणे या लाइफस्टाईल बाहेर येणे, त्यावरुन वाद होऊन हे संबंध तुटल्याचे सर्वेमध्ये आढळून आले. मागील काळात खूप सारे लग्न हे हुंड्यासाठी तुटत असत परंतु आताच्या काळात सोशल मीडियाच्या कारणाने तुटतात. मागील पाच वर्षात लग्न तुटण्याची संख्या खूप वाढली आहे. ६० ते ७० टक्के लग्न सोशल मीडियाच्या कारणाने तुटत आहे.

आपण भौतिक साधनांमध्ये खूप प्रगती केली आहे. मात्र खर्या अर्थाने सुखी झालो आहोत, असे म्हणता येणार नाही. तर यासाठी आपणच कारणीभूत आहोत. आपलेच आपल्यावर नियंत्रण नाही. आपण कसेही वाहत जातो, असे म्हणणे जास्त योग्य ठरते. तसेच सोशल मीडिया हे दुधारी शस्त्र आहे, याचा वापर जपून करणे ही काळाची गरज आहे.

शेवटी सोशल मीडिया वापरण्यावर नियंत्रणबाबत एक शेर आठवतो....

**हर पल लाइक्स का दबाव बरसता हैं,**
**मासूम दिलों पर बोझ सा पडता हैं।**
**अच्छा किया जो रोक लगा दी,**
**कम उम्र में ये जाल गहरा ही पडता हैं।**

## महाराष्ट्रात परत एकदा निवडणूकीचा धुरळा उडणारं...

### वाचक पत्र

मुंबईसह महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका निवडणुकीसाठी बिगुल वाजला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा महाराष्ट्रात निवडणुकीचा धुरळा उडणार आहे. महापालिकेच्या २२७ जागांसह एकूण २ हजार ८६९ जागांसाठी हि निवडणूक १५ जानेवारीला होत आहे.

तर १६ ला निकाल त्याचं पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सर्वचं पक्षांची जोरदार तयारी सुरु केली असून सगळीकडे निवडणुकीचा ज्वर वाढत आहे. सत्ताधाऱ्यांनी लाडकी बहिण योजना कार्यान्वित केली आहे. लाभार्थीं महिलांच्या खात्यात दरमहा १५००/- रुपये देणारी ही योजना महाराष्ट्रात चांगलीचं चर्चेत आली असली तरी प्रामुख्याने जिवनावश्यक वस्तूंचे भाव कमी करणे गरजेचे असताना हि योजना कार्यान्वित करुन बोळवण केली आहे. सद्या झपाट्याने अनेक वास्तूंचे भाव गगनाला जावून भिडले आहेत. काही ठिकाणी अतिवृष्टी तर कुठे दुष्काळ सदृष्टस्थिती यामुळे अनेक पिकांना फटका बसला आहे. याच्याकडे सरकारचे लक्ष नाही फक्तं आणि फक्तं निवडणूका डोळ्यासमोर ठेवून मतांचा जोगवा मागण्यासाठी असल्या योजना कार्यान्वित केल्या जात आहेत का ? लाडक्या योजनेच्या मुद्यावरुन अनेक नेते विविध सभेतून आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत.

नेटकॅफेमध्ये ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी महिलांना तासन्तास ताटकळत रहावे लागते आहे. त्यामुळे महिलांच्या कामाचे नियोजन कोलमोडले असून सरकारने असल्या योजना राबवण्यापेक्षा शाश्वत विकासाचे सार्वजनिक प्रश्न सोडवले पाहिजेत हि योजना ज्या महिला पात्र आहेत त्यांना लाभ मिळणारं आहे. मग अपात्र आहेत त्यांचे काय ? तमाम महाराष्ट्रातील जनता लाडकी नाही काय ? असा देखिल सवाल विचारला जात आहे. त्यासाठी सरकारने सार्वजनिक कामाला प्राधान्यक्रम देणे कधीही हिताचे ठरणारं आहे.

आज महाराष्ट्रात अपहरण, महागाई, खून, बलात्कार, भ्रष्टाचार, अपघात, मारामारी, बेरोजगारी असले प्रकार वाढत असताना सरकार फक्तं निवडणूकीचा विषय घेवून सभा, विविध कार्यक्रमांचे इव्हेंट यामध्येचं गुंतले आहे. त्यामुळे लोकप्रिय योजना राबवली म्हणजे जनतेचे प्रश्न सुटले असा त्याचा अर्थ होत नाही म्हणूनचं सद्याची निवडणूक सत्ताधाऱ्यांना सोपी राहिलेली नाही.

**- राजू जाधव,**
**मांगूर जि.बेळगांव**

### मृद संधारण

निसर्ग हा प्रयत्नांती
बनवतो सुपिकमाती
आपण मृद् विरोधक
करुनि टाकतो माती

मृदेचेस्वास्थ्य टिकायं
आवश्यकजनजागृति
सॉईल हेल्थकार्डातून
सहजते शक्य प्रगति

रासायनिकखते टाळू
जपायची मृद् संपत्ती
माय मातीच्या प्रेमाने
माघारपाठवू आपत्ती

सेंद्रिय खनिज पदार्थ
स्वताचं करते उत्पत्ती
कारखान्यात कधीही
तयार न हो मातीप्रति

जैवविविधता संरक्षण
जादुची छडी या हाती
मृदा प्रदूषण टाळायचे
बनवायला समृद्धप्रति

प्रशिक्षण दारे उघडावे
सुधारा शेती मशागती
निसर्ग समतोल साधा
करताआधुनिकप्रगति

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

## मूल्यशिक्षण काळाची गरज !!

दोन तीन महिन्यांपूर्वी झालेल्या भांडणातून दहावीच्या विद्यार्थ्याने खाजगी शिकवणी वर्गातील सहाध्यायी विद्यार्थ्याचा शिकवणी सुरू असतानाच धारधार शस्त्राने मानेवर आणि पोटावर वार करून निर्घुण खून केल्याची घटना पुणे जिल्ह्यातील राजगुरुनगर येथे सोमवारी घडली. पुण्यासारख्या शिक्षणाच्या माहेरघरात घडलेल्या या घटनेतील आरोपी शाळकरी असल्याने सर्वत्र खळबळ माजली आहे अर्थात अल्पवयीन मुलाने केलेला हा पहिलाच गंभीर गुन्हा नाही. याआधीही असे अनेक गंभीर गुन्हे अल्पवयीन मुलांकडून घडले आहेत.

मागील वर्षी पुण्यातच शाळेची बॅग फाडली या किरकोळ कारणाने एका शाळकरी विद्यार्थ्याने दुसऱ्या शाळकरी विद्यार्थ्यावर चाकूने वार केल्याची घटना घडली होती. तीन वर्षापूर्वी क्राईम मालिका पाहून एका अल्पवयीन मुलाने आपल्या आजीची हत्या केल्याची घटना पुण्यातच घडली होती. त्याच वर्षी एका आठ वर्षीय मुलाने आपल्याच पाच वर्षीय बहिणीवर ब्लेडने वार करून हत्या केल्याची घटना जालना शहरात घडली होती. अल्पवयीन मुलांकडून असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडल्याच्या बातम्या अलीकडे सातत्याने वर्तमानपत्रात वाचायला मिळतात याचाच अर्थ देशात बाल गुन्हेगारी वाढत चालली आहे. सण २०२२ - २३ या एका वर्षात एकट्या पुणे शहरात अशा प्रकारचे २४८ गुन्हे घडले असून पुण्याच्या ग्रामीण भागात १०४ गुन्हे घडले आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवालातच ही आकडेवारी नमूद करण्यात आली आहे. जर एकट्या पुण्यात अल्पवयीन मुलांकडून इतके गुन्हे होत असतील तर संपूर्ण राज्यात आणि देशात अल्पवयीन मुलांकडून किती गुन्हे घडत असतील याची फक्त कल्पना केली तरी अंगावर काटा येतो. अर्थात देण्यात आलेली ही आकडेवारी फक्त नोंद झालेल्या गुन्ह्यांचीच आहे. पोलिस दप्तरी नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यांपैकी काही गुन्हे खून, बलात्कार, विनयभंग, अपहरण यासारखे गंभीर स्वरूपाचे देखील आहेत. गेल्या काही वर्षात बाल गुन्हेगारीचे प्रमाण खूप वाढले आहे. आजकालची मुले गुन्हेगार बनत आहेत ही अत्यंत धोक्याची व खेदाची बाब आहे. झोपडपट्टीत राहणारे अल्प उत्पन्न गटातील मुले गुन्हेगारीकडे लवकर ओढले जातात असे म्हंटले जाते. त्यांचे आई वडील मोल मजुरीसाठी घराबाहेर राहतात त्यामुळे ते मुलांना योग्य संस्कार देऊ शकत नाहीत परिणामी ही मुले गुन्हेगारीकडे वळतात असा तर्क काढला जातो. पण पुण्यातील या व या आधीच्या घटनेने तसेच जालन्यातील घटनेने हा तर्क चुकीचा ठरवला आहे.

या सर्व घटनेतील मुलांचे पालक उच्चशिक्षित असून हे सर्व मुले शहरातील प्रतिष्ठित शाळेतील विद्यार्थी आहेत. याचाच अर्थ सुशिक्षित पालकांचे मुलेही आता गुन्हेगारीकडे वळू लागले आहेत. भारतासारख्या देशात वाढती बाल गुन्हेगारी ही मोठी समस्या बनली आहे. आजकालच्या मुलांमध्ये भाई, दादा, डॉन बनण्याची मोठी क्रेझ आहे. त्यामुळे ते गुन्हेगारीकडे वळत आहेत. अल्पवयीन मुलांच्या टोळ्या, गँग वाढत आहेत. पालकांचे लक्ष नसल्याने चोऱ्या, मारामारी, खून यासारख्या गुन्ह्यात अल्पवयीन मुले अडकत आहेत. या मुलांना वेळीच सल्ला किंवा मार्गदर्शन मिळत नाही ही वसतुस्थिती आहे. देशातील बाल गुन्हेगारी वाढत आहे ही धोक्याची घंटा आहे. ती कमी करण्यासाठी मुलांना संस्कारक्षम वयात पालक, शिक्षक, समाज यांच्याकडून योग्य संस्कार व मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. लहान वयात मुले काय करतात, त्यांच्या आवडीनिवडी काय आहेत याचाही विचार आई वडीलांनी करायला हवा. अभ्यासाकडे मुले दुर्लक्ष का करतात याचाही विचार पालक आणि क्षिक्षकांनी करायला हवा. शिक्षणाऐवजी मुले गुन्हेगारीकडे वळत आहे ही चिंतनीय बाब आहे याला जितकी सामाजिक परिस्थिती जबाबदार आहे तितकीच कौटुंबिक परिस्थिती देखील जबाबदार आहे. आपल्या देशात जोवर एकत्र कुटुंब पद्धती होती तोवर बाल गुन्हेगारीचे प्रमाण नगण्य होते पण एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास झाला आणि बाल गुन्हेगारी फोफावत गेली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी पालक वाट्टेल ते करतात. त्यांना मोठ मोठ्या इंटरनॅशनल स्कूलमध्ये लाखो रुपये डोनेशन देऊन दाखल करतात. त्यांना हव्या त्या सर्व वस्तू पुरवतात पण मुलांसोबत वेळ घालवण्यास पालकांना फुरसत नसते. त्रिकोणी, चौकोनी कुटुंब पद्धतीत आजी आजोबा ही संकल्पना केंव्हाच मागे पडली आहे. आई वडील दोघेही नोकरीस असेल तर मुले दिवसभर घरी एकटीच असतात अशावेळी टीव्ही आणि मोबाईल हेच त्यांचे साथीदार असतात. मग दिवसभर टीव्ही वरील क्राईम मालिका पाहणे आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळणे हाच त्यांचा उद्योग. दिवसभर क्राईम मालिका पाहून आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळून मुलांच्या मनातही हिंसक विचार येतात. त्यातूनच मग अशा घटना घडतात. त्यामुळेच आज मूल्यशिक्षणाची मोठी गरज निर्माण झाली आहे. आज मुलांना जितकी शिक्षणाची गरज आहे तितकीच मूल्यशिक्षणाचीही आहे. परीक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या आकडेवारीत मूल्यशिक्षण हरवत चालले आहे. मुलांवर संस्कार करण्यात पालक, शिक्षक आणि समाज कमी पडत आहे. मुलांवर संस्कार होण्यासाठी मूल्यशिक्षणाला पर्याय नाही. मूल्यशिक्षण काळाची गरज बनली आहे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## शेरे गावचा सुपुत्र ओमकार तारमळे आयपीएल २०२६ साठी हैदराबाद संघात निवड




**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१६, शहापूर (ठाणे) :** ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील शेरे गावचा सुपुत्र कु. ओमकार तारमळे याची आयपीएल २०२६ साठी हैदराबाद संघात निवड झाली असून, या ऐतिहासिक यशामुळे संपूर्ण शहापूर तालुका व ठाणे जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातून आयपीएलमध्ये निवड होणारा ओमकार हा शहापूर तालुक्यातील पहिला खेळाडू ठरला आहे.

साध्या व सरळ कुटुंबातून आलेल्या ओमकारने आपल्या अतूट जिद्दीने, कठोर परिश्रमाने आणि क्रिकेटमधील नैसर्गिक कौशल्याच्या जोरावर मुंबईपासून दिल्लीपर्यंतचा प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण केला. आयपीएलच्या लिलावात जगभरातील नामवंत खेळाडूंमध्ये त्याचे नाव झळकणे ही बाब संपूर्ण ठाणे जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे. ओमकारच्या या यशामागे त्याची सातत्यपूर्ण मेहनत, कुटुंबीयांचा पाठिंबा, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि अनेक हितचिंतकांचे सहकार्य मोलाचे ठरले आहे. त्याच्या या यशोगाथेमुळे ग्रामीण भागातील तरुण खेळाडूंना नवी प्रेरणा मिळाली असून, मोठी स्वप्ने पाहिली आणि जिद्दीने प्रयत्न केले तर कोणतीही अडचण आडवी येत नाही, हे त्याने सिद्ध करून दाखवले आहे. शेरे गावाचा, शहापूर तालुक्याचा आणि ठाणे जिल्ह्याचा नावलौकिक वाढवणाऱ्या या होतकरू क्रिकेटपटूचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, त्याच्या पुढील क्रिकेट कारकिर्दीसाठी सर्वत्र शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## पारनेर शहरातील रस्त्यांना दोन कोटींचा निधी मंजूर

### सुजित झावरे यांच्या पाठपुराव्याला यश



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर शहराच्या विकास आराखड्याला नुकतीच मंजुरी मिळाली आणि त्यासोबत पारनेर शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांच्या कामांसाठी दोन कोटी रुपयांचा मंजूर झालेला निधी ही पारनेरकरांसाठी मोठी दिलासादायक बातमी ठरली आहे. हा निधी मिळविण्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला आहे, असे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी सांगितले. झावरे म्हणाले की, रस्त्यांच्या दुरुस्ती व मजबूतीकरणाच्या कामांमुळे नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन सुचविलेल्या चार महत्वपूर्ण रस्त्यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजुरी दिल्याचे झावरे यांनी स्पष्ट केले. पारनेर शहरातील वाढती लोकसंख्या, वाहतूक आणि सुविधा यांचा वेगाने विस्तार होण्यासाठी चांगली पायाभूत सुविधा अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तालुक्यातील विकासासाठी दिलेला शब्द पूर्ण केला आहे. शहरातील रस्ते, स्मशानभूमी आणि इतर मूलभूत सुविधांसाठी मंजूर झालेल्या निधीमुळे शहराचा चेहरामोहरा बदलणार आहे. आगामी काळात पारनेर तालुक्यातील रखडलेली अनेक विकासकामे मार्गी लावण्यासाठी मी सदैव कटिबध्द आहे असे ते म्हणाले.

**मंजूर रस्ते अन् मिळालेला निधी !**

पारनेर जामगाव रस्ता ते बुगेवाडी,सोबलेवाडी रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे: ५० लाख रुपये, पारनेर ते सिद्धेश्वरवाडी रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे: ५० लाख रुपये, पारनेर कान्हुर रोड ते दशक्रिया विधी रस्ता काँक्रिटीकरण करणे: ५० लाख रुपये, नगरपंचायत हद्दीतील स्मशानभूमी विकास करणे या कामासाठी ५० लाख रुपये

## चंद्रपूर मनपात शिस्तीचा 'आयएएस पॅटर्न'

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** वर्ष २०१२ रोजी चंद्रपूर महानगरपालिका अस्तित्वात आल्यावर प्रथमच १३ वर्षांनी मनपाला आयएएस दर्जाचा अधिकारी लाभला. मनपा आयुक्त अकनुरी नरेश यांनी पदभार सांभाळल्यावर कार्यालयात उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांना शिस्तीचे धडे देण्यास सुरुवात केली आहे.

१५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता मनपा आयुक्त अकनुरी नरेश कार्यालयात दाखल झाले. मात्र, यावेळी अनेक कर्मचारी कार्यालयात आले नव्हते. कर्मचाऱ्यांसह अधिकारी कार्यालयीन वेळेत येत नसल्याचे निदर्शनास आल्यावर मनपा आयुक्तांनी थेट मनपाचे प्रवोशद्वार बंद केले. काही वेळानी कर्मचारी व अधिकारी मनपात दाखल झाले असता, प्रवेशद्वार बाहेरुन बंद असल्याचे समजले. मनपात २ वर्षापासून प्रशासक बसल्यावर अधिकारी व कर्मचारी पूर्णत: बेभान झाले होते. कार्यालयीन वेळेवर न पोहोचता अधिकारी आपल्या सोयीनुसार कार्यालयात येत होते. मात्र आजच्या प्रकारामुळे मनपा अधिकारी व कर्मचाऱ्यांना चांगलीच अद्दल घडली असल्याचे चित्र दिसले.

नेहमी नागरिकांना बाहेर ताटकळत उभे ठेवणारे अधिकारी आज स्वत: बाहेर ताटकळत उभे होते. मनपा आयुक्त अकनुरी नरेश यांनी उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांसोबत असे वागणे व त्यांना शिस्त लावण्याचा हा प्रकार दिवसभर जनमानसात चर्चेत होता.

# अवैध रेती वाहतूक करणाऱ्या हायवाच्या धडकेत एकाचा मृत्यू !

## मुदखेड कडकडीत बंद ; आज तहसिल कार्यालयवर मोर्चा !

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१६, मुदखेड (नांदेड) :**

मुदखेड येथील सुवर्ण कारागीर स्व.संतोष किशन टाक हे मंगळवारी सकाळी बारडच्या श्री. शितला देवीचे दर्शन घेऊन मुदखेडला परत येत असताना सिता नदी वळणावर सुसाट वेगाने अवैध रेती वाहतूक करणाऱ्या अज्ञात हायावाने दुचाकीस्वार संतोष टाक यांना उडवले. त्यांचे जागीच दोन्ही पाय निकामी झाली होती. त्यांना नांदेड येथील खाजगी रुग्णालयात ताबडतोब दाखल करण्यात आले होते.

पण उपचारा दरम्यान त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. आपल्या मित्रासोबत दर मंगळवारी नित्यनेमाने देवीच्या दर्शनासाठी बारडला जात होते. दि.१६ डिसेंबर रोजी सकाळी ९ च्या दरम्यान ही दुर्दैवी घटना घडली



आहे. एका अज्ञात अवैध रेती वाहतूक करणाऱ्या हायवाने आधी उडवले तर दुसऱ्या अज्ञात हायावाने चीरडले होते. नंतर मुदखेड शहरवासीयांनी कडकडीत बंद पाळला आणि निषेध व्यक्त केला आहे. आज शहरांतील व परिसरातील सर्वपक्षिय नागरीकांचा मुदखेड तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे.

स्व.संतोष किशन टाक हे गजानन कदम यांच्या सराफा दुकानात कामाला होते. अजातशत्रू अशी त्यांची ओळख होती. त्यांचे लहान बंधु स्व. बालाजी टाक यांचा मृत्यु सुध्दा अपघाता मुळेच झाला होता, अपघात झाल्या नंतर एक पाय गमावलेल्या स्व.बालाजी टाक काही वर्षानंतर वाचले होते.

स्व. संतोष टाक व त्यांच्या भावाचा अपघातात मृत्यु होणे हा दुर्दैवी योगायोग आहे. स्व. बालाजी टाक यांचे जुन्या गावांत सराफा दुकान होते. मुदखेड शहर व परिसरातील अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वाळू माफियांचा हा कितवा बळी गेलाय हे महसुली प्रशासनाला च माहित.! याचा जाब महसुल प्रशासनाला विचाराण्या साठी उद्या दि. १७ डिसेंबर रोजी सर्वपक्षिय मोर्चा तहसील कार्यालयावर काढण्यात येणार आहे स्व.संतोष टाक यांनी आपल्या भावाच्या दुर्दैवी मृत्युनंतर स्वकष्टाने आपला संसार केला. आपल्या तीन मुलींचे लग्न केले व स्वतः चे घर बांधले आहे. त्यांच्या पश्चात पत्नीसह, तीन मुली, एक मुलगा, नातवंड आहेत. मनमिळावू, होतकरू, कष्टाळू व अजातशत्रू स्व. संतोष टाक यांच्या दुर्दैवी मृत्यू मुळे त्यांच्या परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आप्तस्वकीय व मित्र मंडळी मध्ये हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.रेती माफियांच्या दोन अज्ञात हायवा गाडीने स्व. संतोष टाक यांचा बळी घेतला आहे. आता महसुल प्रशासन व पोलीस प्रशासन काय कारवाई करणार या कडे शहरांतील व परिसरातील नागरिकांचे लक्ष आहे.

# जयकुमार गोरे व माजी आ.दिलीप माने यांच्यात बंदद्वार चर्चा

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.१६, सोलापूर :** पालकमंत्री जयकुमार गोरे आणि माजी आमदार दिलीप माने यांच्यात सोमवारी येथील शासकीय विश्रामगृहात बंद खोलीत चर्चा झाली. परंतु या बैठकीचा सविस्तर वृत्तांत उपलब्ध होऊ शकला नाही. मात्र आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ना. गोरे, माजी आ.दिलीप माने यांच्यात झालेल्या बैठकीला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. यावेळी आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, भाजपच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, प्रदेश कार्यकारिणी सदस्य संतोष पाटील यांची उपस्थिती राजकीय दृष्टिकोनातून लक्षवेधी मानली



जात आहे. दक्षिण सोलापूर विधानसभा मतदार संघाचे आमदार सुभाष देशमुख यांच्या निकटवर्तीय कार्यकर्त्यांनी माजी आमदार माने यांच्या भाजप प्रवेशाला विरोध दर्शविला होता. बापू समर्थकांनी तर शहर भाजप कार्यालयासमोर निदर्शने करत प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण यांना निवेदन देण्यात आले होते. त्यामुळे दिलीप माने यांचा महापालिका निवडणुकीपूर्वी भाजप प्रवेश होणार का ? याची सर्वांनाच उत्सुकता आहे.

**दिलीप माने यांच्यासोबत पक्षविरहित मैत्री – आ. सचिन कल्याणशेट्टी**

माजी आमदार दिलीप माने यांचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह इतर भाजप नेत्यांसोबत पक्षविरहित मैत्रीचे नाते आहे. सोमवारी झालेल्या भेटीदरम्यान कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही. पालकमंत्री दौऱ्यावर आल्यानंतर नेहमीप्रमाणे अनेक जण भेटतात. त्याप्रमाणे माजी आमदार माने यांनी पालकमंत्र्यांची भेट घेतली. ही कोणतीही राजकीय भेट नसून ती एक अनौपचारिक भेट होती, असे आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

## भाजप प्रवेशाच्या चर्चेला पुन्हा उधाण !

या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे आणि माजी आमदार दिलीप माने यांच्यात महापालिका निवडणुकीची आचारसंहिता लागण्याच्या काही तास अगोदर बंद खोलीत झालेल्या चर्चेत कोणत्या मुद्द्यांवर ऊहापोह झाला? या निवडणुकीत दिलीप माने यांची राजकीय भूमिका काय असणार? याबाबत सध्यातरी सस्पेन्स कायम आहे.

# मंद्रूप ग्रामदैवत श्री मळसिध्दप्पा यात्रेत यंदा कृषी प्रदर्शन आणि लक्ष दीपोत्सवाचा संकल्प

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.१६, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथील श्री मळसिध्दप्पा यात्रेत शेतकरी बांधवांसाठी कृषी प्रदर्शन आणि लक्ष दीपोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. हे दोन्ही उपक्रम यशस्वी करण्याचा निर्धार नियोजन बैठकीत करण्यात आला.

रविवारी, मळसिध्दप्पा यात्रेच्या नियोजन संदर्भात यात्रा कमिटीचे अध्यक्ष अँड.राजेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.यावेळी बैठकीस माजी सभापती गुरुसिद्ध म्हेत्रे व अप्पाराव कोरे, हर्षवर्धन देशमुख मळसिध्द मुगळे, जगन्नाथ म्हेत्रे, सुरेश पाटील, बाळासाहेब देशमुख, मळसिध्द पुजारी,गौरीशंकर मेंडगुदले, लक्ष्मण सुतार,कांतू ख्याडे,चंद्रकांत देशमुख, विश्वनाथ हिरेमठ, अनंत म्हेत्रे,मुत्या वाडकर,तमण्णा पुजारी, सुरेश टेळे, नितीन टेळे, शब्बीर मुल्ला, अविनाश



देशमुख आदी उपस्थित होते.

यावर्षीपासून यात्रा कालावधीत शेतकरी बांधवांसाठी कृषी प्रदर्शनाचे आयोजन करावेत तसेच मंदिर परिसर आणि नंदीध्वज मिरवणूक मार्गावर लक्ष दीपोत्सव सुरू करावेत अशी सूचना मांडली.

यावेळी यात्रा कमिटीचे अध्यक्ष राजेश देशमुख यांनी या वर्षीपासून कृषी प्रदर्शन सुरू करण्याचा निर्धार व्यक्त केला तसेच अक्षता सोहळ्याच्या दिवशी गावात लक्ष दीपोत्सव साजरा करण्यात येईल अशी घोषणा केली.

दरवर्षी नंदीध्वज मिरवणुकीस उशीर होतो, यावर्षी उशीर होऊ नये यासाठी सर्व नंदीध्वजाच्या मिरवणुका यात्रा कालावधीमध्ये वेळेवर निघावेत अशा सूचना सर्व मानकरी बांधवांना करण्यात आले. यावेळी यात्रा कालावधीत कांतू ख्याडे यांच्यावतीने रांगोळी सेवा देण्यात येईल अशी ग्वाही ख्याडे यांनी दिली.

यंदाही सलग पाच दिवस यात्रेच्या कालावधीत विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्व जाती धर्मांना, मंद्रूपसह पंचक्रोशीतील ग्रामस्थांना सोबत घेऊन यंदाचा यात्रा महोत्सव अभूतपूर्व साजरा करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. या बैठकीचे प्रास्तविक व सूत्रसंचालन पंचाक्षरी स्वामी यांनी केले तर आभार हर्षवर्धन देशमुख यांनी मानले.

**तीन दिवस कृषी प्रदर्शन !**

मंद्रूपच्या ग्रामदैवत मळसिध्द यात्रेत यंदा दोन ते तीन दिवस कृषी प्रदर्शन भरविण्याचा संकल्प आम्ही केला आहे. हे कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांना आधुनिक शेती कसे करावेत,शेतीमध्ये कोणते उपकरणे वापरावेत यासह शेतीमधील तज्ञ व्यक्तींचे व्याख्यान घेण्याचा संकल्प आहे. तसेच अक्षता सोहळ्या दिवशी लक्ष दीपोत्सव होईल. मंद्रूपसह पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी या यात्रेत तन-मन-धनाने सहभागी व्हावेत असे आवाहन मळसिध्दप्पा यात्रा कमिटीचे अध्यक्ष एडवोकेट राजेश देशमुख यांनी केले आहे.

# पनवेल मनपा निवडणूकीसाठी प्रशासन सज्ज

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, पनवेल :** राज्य निवडणूक आयोगाकडून महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक– २०२५ चा कार्यक्रम १५ जानेवारी रोजी जाहीर करण्यात आला आहे. या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या अधिकाऱ्यांची दि. १६ डिसेंबर रोजी मुख्यालयात निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

पनवेल महानगरपालिकेसाठी बहुसदस्यीय पद्धतीने २० प्रभागातील ७८ जागांसाठी निवडणूक होणार असून १५ जानेवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष मतदान पार पडणार आहे. या निवडणुकीसाठी ६ निवडणूक निर्णय अधिकारी आणि १२ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्त अधिकाऱ्यांमध्ये उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, अप्पर तहसीलदार तसेच महानगरपालिका व इतर शासकीय विभागांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा



समावेश आहे. प्रत्येक निवडणूक विभागासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह दोन सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.

निवडणूक प्रक्रियेदरम्यान मतदान केंद्रांची व्यवस्था, उमेदवारी अर्जांची छाननी, मतदान, मतमोजणी तसेच आयोगाने दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करणे अशा विविध तरतूदींवरती यावेळी चर्चा करण्यात आली.

निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांनी नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक आयोगाच्या नियमावलीनुसार कामकाज पार पाडण्याचे निर्देश दिले असून, राजकीय पक्षाशी व पोलिस विभागाची बैठक तसेच मतदान प्रशिक्षणाबाबत यावेळी नियोजन करण्यात आले.

पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका मुक्त, निष्पक्ष व शांततेत पार पडाव्यात, यासाठी प्रशासन सज्ज असून नागरिकांनीही निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रभागनिहाय नियुक्त निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी

प्रभाग क्रमांक १,२,३ चे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून भारत वाघमारे (जिल्हाधिकारी पुनर्वसन, रायगड) यांची नियुक्ती केली आहे. तसेच अर्चना प्रधान आणि नितीन राठोड यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रभाग ४,५,६ चे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ज्ञानेश्वर खुटवड (उपविभागीय अधिकारी) यांची नियुक्ती केली आहे. तसेच संतोष मांढरे आणि नितीन राठोड यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रभाग ७,८,९,१० निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अमित शेडगे (मुद्रांक जिल्हाधिकारी) यांची नियुक्ती केली आहे. नरेश पेढवी, विशाल हुडेकर, यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रभाग क्रमांक ११,१२,१३ चे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अविशकुमार सोनोने (उपजिल्हाधिकारी मेट्रो) यांची नियुक्ती केली आहे. रविंद्र सानप आणि सिद्धार्थ कांबळे यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रभाग १४.१५.१६ चे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ललिता बाबर (उपायुक्त नवी मुंबई मनपा) यांची नियुक्ती केली आहे. जितेंद्र इंगळे आणि सौरभ परभरणकर यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रभाग १७.१८,१९,२० चे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पवन चांडक (उपविभागीय अधिकारी) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भारत फुलपगारे आणि कविता मोकल यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# आयुध निर्माणी चांदा येथील अनुकंपा धारकांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा होणार

## संरक्षण मंत्री सिंह यांच्याकडे 'वन - टाईम रिलॅक्सेशन' च्या मागणीकरीता खा.धानोरकर यांची भेट

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** आयुध निर्माणी चांदा येथील अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या प्रलंबित प्रश्नावर खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर मोठे यश मिळणार आहे. गेली अनेक वर्षे न्याय मिळण्याची वाट पाहणाऱ्या आणि आपल्या कुटुंबातील सदस्याला गमावलेल्या कामगार कुटुंबीयांच्या या प्रश्नाला खा.प्रतिभा धानोरकर यांनी सातत्याने केद्र सरकारच्या निदर्शनास आणून दिले होते. यावर निर्णय घेण्यासाठी खा. प्रतिभा धानोरकर यांनी दिल्ली येथे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेऊन या विषयावर चर्चा केली आणि तात्काळ हा प्रश्न मार्गी काढण्याची विनंती केली. या मागणीची दखल घेत संरक्षण मंत्र्यांनी चांदा येथील कामगार कुटुंबीयांना मोठा दिलासा देणारे आश्वासन दिले आहे.

संरक्षण मंत्र्यांनी खा.प्रतिभा धानोरकर यांची मागणी मंजूर करुन अशी आश्वासन दिले असून, आयुध निर्माणी



चांदा येथील अनुकंपा धारकांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. ा महत्वपूर्ण आश्वासनानुसार, गेल्या ३ वर्षापासून नियुक्ती पत्राच्या प्रतिक्षेत असलेल्या आणि आवश्यक लिखित परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केलेल्या २३ अनुकंपा धारकांना कोणतीही दिरंगाई न करता नियुक्ती देण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. तसेच, निगमीकरण प्रक्रियेमुळे नियुक्तीसाठी पात्र नसलेल्या उर्वरित सर्व अनुकंपा धारकांना देखील दिलासा मिळाला आहे. या सर्व अनुकंपा धारकांना 'वन - टाईम रिलॅक्सेशन' च्या माध्यमातून १०० टक्के अनुकंपा तत्वावर समायोजित करण्याची मागणी देखील संरक्षण मंत्र्यांनी स्वीकारली आहे. ती त्वरित पूर्ण करण्याचे आश्वासन दिले असून संबधित यंत्रणेला हा प्रश्न त्वरित मार्गी काढण्याचे निर्देश यावेळी संरक्षण मंत्र्यांनी दिले.

या आश्वासनाबद्दल खा. प्रतिभा धानोरकर यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचे मन: पूर्वक आभार मानले. त्या म्हणाल्या, हा निर्णय केवळ २३ किंवा त्याहून अधिक कुटुंबांना नोकरी देणारा नाही, तर अनेक वर्षांपासून न्याय मिळण्याची वाट पाहणाऱ्या शेकडो कुटुंबांना सामाजिक आणि आर्थिक आधार देणारा आहे. त्यांच्या संघर्षाला अखेर यश येणार असून, त्यांचे शोषण थांबले आहे. ' हे आश्वासन चांदा येथील कामगार कुटुंबीयांसाठी अत्यंत महत्वाचे असून, प्रलंबित असलेल्या अनुकंपा नियुक्तीच्या प्रक्रियेतील सर्व अडथळे दूर होणार आहे.

# थोडक्यात

## माना रोड–इरई नदी परिसरात वाघाचा हल्ला

### गाईचा बछडा ठार, गाय जखमी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** माना रोड जवळील इरई नदी परिसरात वाघाने गाईच्या बछड्यावर हल्ला करून त्यास ठार केले असून गाईला गंभीर दुखापत झाल्याची घटना घडली आहे. या घटनेची माहिती प्रभागातील रहिवासी राजू गजर यांनी अमोल शेंडे यांना दिली. माहिती मिळताच अमोल शेंडे यांनी तात्काळ वनविभागाचे आरएफओ नायगमकर यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला. त्यांच्या सूचनेनुसार वनरक्षक प्रदीप कोडापे व वनमजूर जलील शेख यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. सदर प्रकरण मदती व भरपाईसाठी शासनाकडे पाठवण्यात आले आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी या परिसरात वाघाचा संचार असल्याचे निष्पन्न केल्याचे सांगत, पंचनाम्यानंतर बाधित पशुधनधारकास तात्काळ भरपाई मिळवून देण्यासाठी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही दिली आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर अमोल शेंडे यांनी नागरिकांना सतर्कतेचे आवाहन केले आहे. नागरिकांनी एकटे फिरणे टाळावे, विशेषतः पहाटे व सायंकाळच्या वेळी बाहेर जाणे टाळावे. आवश्यक असल्यास किमान चार ते पाच जणांनी एकत्र फिरावे व सोबत काठी बाळगावी, असेही त्यांनी सांगितले. स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेसाठी वनविभाग व प्रशासनाशी सातत्याने समन्वय ठेवून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचा निर्धार अमोल शेंडे यांनी व्यक्त केला आहे.

# निघोजमध्ये भव्य कीर्तन महोत्सवाचे दि.१८ पासून आयोजन

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१६, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील दुध उत्पादकांचे कैवारी म्हणून प्रसिद्ध असलेले हजारो हातांना रोजगार उपलब्ध करुन देणारे कन्हैय्या परिवाराचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत शांताराम मामा लंके यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त निघोज गुरुवार, दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी ते दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी या कालखंडात तालुक्यात अखंड ज्ञानज्योत तेवत ठेवण्यासाठी राज्यातील नामवंत किर्तनकारांचे ही किर्तनांचा भव्य किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कन्हैया परिवाराचे संचालक, महानगर बँकेचे संचालक व प्रसिद्ध उद्योजक बबनराव लंके यांनी दिली आहे.

पारनेर तालुक्यात प्रथम दुध उत्पादकांचे व निघोज परिसरात मामा म्हणून प्रसिद्ध असलेले शांताराम भाऊ लंके हे साधे व सालस व्यक्ती महत्व होय. कोठे ही धार्मिक, आध्यात्मिक, सामाजिक कार्यक्रम असला की, शांताराम मामा लंके हे तेथे तन, मन, धनाने उपस्थित राहत असे. त्यांनी तालुक्यातील अनेक अखंड हरिनाम



सप्ताहांना योगदान दिले. सप्ताह म्हटला की, त्यांचा सल्ला व मार्गदर्शन घेतले जात असे. आध्यामिक व धार्मिक क्षेत्रातील दिग्गज विचारवंत किर्तनकार महाराजांशी त्यांचे अत्यंत घनिष्ट संबंध होते.

दिवंगत शांताराम मामांनी स्थापन केलेल्या लंके (कन्हैया) परिवाराच्या कन्हैय्या दुध उद्योग, दुध पावडर प्रक्रिया उद्योग, शुद्ध पाणी उदयोग, पेट्रोल पंप, कन्हैय्या मल्टीस्टेट पतसंस्था या व इतर व्यवसायात निघोज परिसरात हजारो लोकांना पोटासाठी रोजगार देऊन त्यांच्या चुली पेटविल्या. त्याचबरोबर अनेक वर्षांपासून अखंडपणे सुरू केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहातील ज्ञानदान यज्ञात आज अखेर पारनेर, शिरूर, जुन्नर व नगर तालुक्यातील लाखो भाविक भक्तांनी सहभाग घेतला आहे. या सप्ताहात राज्यातील दिग्गज किर्तनकारांनी आपले हरिकिर्तन सादर करत, परिसर मंत्र मुग्ध केला आहे.

दिवंगत शांताराम मामांच्या गत वर्षी डिसेंबर मध्ये अचानक निधनाने सर्वांना मोठा धक्का बसला. त्यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्ताने भव्य किर्तन महोत्सवात दररोज रात्री ६.३० ते ८.३० वाजता गुरुवार, दि .१८ रोजी पहिल्या पुष्पाची किर्तन सेवा मुंबई येथील हभप जगन्नाथ महाराज पाटील , शुक्रवार, दि.१९ रोजीचे दुसरे पुष्पातील किर्तन सेवा प्रसिद्ध समाजप्रबोधन, किर्तनकार हभप निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर, शनिवार, दि.२० रोजीचे तिसरे पुष्पातील किर्तनसेवा नाशिक येथील किर्तन महर्षी हभप संजय महाराज धोंडगे, रविवार, दि.२१ रोजीचे चौथ्या पुष्पातील किर्तनसेवा श्री क्षेत्र देवीच्या आळंदी येथील संतसेवक हभप ज्ञानेश्वर महाराज कदम छोटे माऊली, सोमवार, दि.२२ रोजीच्या पंचम पुष्पातील किर्तनसेवा केज येथील भावरत्न हभप समाधान महाराज शर्मा, मंगळवार, दि.२३ रोजी सहाव्या पुष्पातील किर्तनसेवा जळगाव येथील हिंदू धर्म प्रचारक हभप ज्ञानेश्वर महाराज जळकेकर, बुधवार, दि.२४ रोजी सातव्या पुष्पातील किर्तनसेवा जळगाव येथील पिंगळा फेम हभप विशाल महाराज खोले तर दिवंगत शांताराम मामा लंके यांच्या प्रथम पुण्यस्मरणा निमित्ताने गुरुवार, दि.२५ रोजी बीड येथील प्रसिद्ध किर्तन केसरी हभप अक्रुर महाराज साखरे यांचे हरिकिर्तन सेवा सकाळी १० ते १२ वाजता आयोजीत करण्यात आले असून तदनंतर महाप्रसाद संपन्न होणार आहे. या किर्तन महोत्सवात गायनाचार्य हभप अभिमान ढाकणे, मयूर म्हस्के, नामदेव तळेकर, गणेश शेंडे, मृदुंगशार्य हभप समाधान कन्हेरकर, मृदुंगसाधक हभप ऋषिकेश सुक्रे व संवादिनी वादक हभप कैलास महाराज सुक्रे व श्री क्षेत्र पिंपळनेर येथील श्री.संत निळोबाराय वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी टाळकरी म्हणून साथ संगत देणार आहेत.

तरी परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपापल्या ज्ञानात भर टाकण्यासाठी या ज्ञान यज्ञात सहभागी होत.महाप्रसादाचा ही लाभ घेण्याचे आवाहन कन्हैय्या परिवाराचे मुख्य कार्यकारी अधिकारी मच्छिंद्र लंके यांनी केले आहे.

## सप्ताहाची पालखी मिरवणुकीची सांगता



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१६, पालम (परभणी) :** पालम शहरातील रंगनाथ महाराज मंदिर येथे रंगनाथ महाराज परभणीकर यांच्या ५६ व्या पुण्यतिथीनिमित्त सुरू असलेल्या सप्ताहाची दिनांक १६ डिसेंबर २०२५ रोजी सांगता झाली. आर्यवैश्य समाज मंडळ व गावकरी यांच्यावतीने प्रतिवर्षी रंगनाथ महाराज गुरुजी परभणीकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते. दि.०९ डिसेंबर पासून सुरू असलेल्या या सप्ताहामध्ये महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकारांची कीर्तन सेवा संपन्न झाली.

सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी दिनांक १६ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता रंगनाथ महाराज गुरुजी परभणीकर यांच्या प्रतिमेची भव्य पालखी मिरवणूक मंदिरापासून शहरातील मुख्य मार्गावरून भक्तिमय वातावरणात, टाळ मृदंगाच्या गजरात संपन्न झाली. यामध्ये शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, कीर्तनकार, भजनी मंडळी, आर्य वैश्य समाज बांधव व महिला, व परिसरातील भाविक भक्त, गावकरी मंडळी सहभागी झाले होते.

या दरम्यान पालखी मिरवणूक नंतर गुरुवर्य भागवताचार्य मराठवाडा भूषण, ह.भ.प नारायण महाराज पालमकर यांचे पूजेचे कीर्तन संपन्न झाले. यानंतर महाप्रसादाचे आयोजन केले होते. सप्ताह यशस्वीतेसाठी समस्त आर्य वैश्य समाज बांधव व गावकरी मंडळी यांनी परिश्रम घेतले.

# पत्रकारांच्या मागण्यांकरिता हिवाळी अधिवेशनात 'राज्य पत्रकार संघा'चे निवेदन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१६, नवी मुंबई :** राज्यातील पत्रकारांच्या प्रलंबित आणि न्याय्य मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने नागपूर येथील विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात धडक देण्यात आली. यावेळी संघाच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळातील प्रमुख मंत्र्यांची भेट घेऊन त्यांना सविस्तर निवेदन सादर केले. पत्रकारांच्या सामाजिक, आर्थिक आणि व्यावसायिक सुरक्षिततेसाठी हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.

पत्रकार संघाचे निवेदन स्वीकारताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, औषध निर्माण मंत्री नरहरी झिरवाळ, क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे, दुग्धविकास मंत्री अतुल सावे, सहकार मंत्री पंकज भोईर, ऊर्जामंत्री मेघना बोर्डीकर आणि आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर उपस्थित होते. या सर्वांनी पत्रकारांच्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा केली.सत्ताधाऱ्यांसोबतच विरोधी पक्षांनीही पाठिंबा दर्शविला आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे गटनेते आ.आदित्य ठाकरे, भाजपचे आ.गोपीचंद पडळकर, आ.अमोल खताळ, आ.विठ्ठलराव लंघे, तसेच सामाजिक कार्यकर्त्या सुषमा अंधारे आणि ज्येष्ठ संपादक प्रकाश पोहरे यांनी उपस्थित राहून पत्रकारांच्या मागण्यांना दुजोरा दिला.

> **काय आहेत प्रमुख मागण्या?**
> निवेदनाद्वारे खालील प्रमुख मागण्या शासनासमोर मांडण्यात आल्या
> पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे.
> पत्रकारांना आरोग्य विमा संरक्षण आणि निवास सुविधा देणे.
> मानधन आणि ज्येष्ठ पत्रकारांसाठी विशेष निवृत्ती वेतन योजना.
> डिजिटल मीडिया, ग्रामीण भागातील पत्रकारांच्या समस्यांचे निराकरण.

राज्याचे माहिती महासंचालक ब्रिजेश सिंग मिश्रा यांची विशेष उपस्थिती कार्यक्रमाचे महत्त्व अधोरेखित करणारी ठरली. यावेळी ऑल इंडिया जर्नलिस्ट असोसिएशनचे (दिल्ली) राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे, राज्य सरचिटणीस आणि 'दैनिक समर्थ गांवकरी'चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, इलेक्ट्रॉनिक्स मीडियाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे, विदर्भ प्रमुख अनुप भार्गव, प्रदीप शेंडे आणि महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. मंत्र्यांनी दिलेल्या सकारात्मक आश्वासनामुळे पत्रकारांच्या हक्कांच्या लढ्याला बळ मिळाले असून, लवकरच या मागण्यांवर शासन योग्य निर्णय घेईल, असा विश्वास पत्रकार संघाने व्यक्त केला आहे.

## खडकवाडी येथील लोहार समाजाच्या इघे कुटुंबाला मदत

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील खडकवाडी येथिल लोहार समाजातील सचिन बबन इघे यांचा दि. ११ ऑक्टोबर २०२५ रोजी अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला होता.



या कुटुंबाला कोल्हापूर गाडी लोहार युवा मंचचे रविंद्र राजाराम पवार यांच्याकडून पीडित कुटुंबासाठी २० हजार रुपयांची आर्थिक मदत मिळाली. सचिन लहानपणापासून घरच्या गरीब परिस्थितीमुळे मिळेल ते काम करायचे मोठ्या हिमतीने तो जीवनाचा संघर्ष करत कुटुंबाची उपजीविका चालवत होता.

परंतु त्याच्यावर काळाने घाला घातला. त्याच्या पाठीमागे वृद्ध आई–वडील , पत्नी, दोन मुली व तीन महिन्याचा मुलगा असा परिवार आहे. या परिवारासाठी खडकवाडी गावातील मराठा बांधवांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली. त्याचबरोबर लोहार समाजातील बहुसंख्य बांधवांनी दशक्रियेच्या दिवशी ४८ हजार रुपयांची आर्थिक मदत केली.

# विज्ञान प्रदर्शनात रयत इंग्लिश मिडिअम स्कूल शिरवळच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१५, खंडाळा (सातारा) :** खंडाळा तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२५- २६ चे यशस्वी आयोजन पंचायत समिती खंडाळा शिक्षण विभाग आणि प.पूज्य बापूजी साळुंखे विद्यालय आसवली यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच करण्यात आले होते.

या विज्ञान प्रदर्शनात रयत इंग्लिश मिडीयम स्कुल शिरवळच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचे आणि वैज्ञानिक चिंतनाचे उत्कृष्ट सादरीकरण केले. या प्रदर्शनात विविध विषयांवरील प्रकल्प मॉडेल्स आणि प्रयोगाचे आकर्षक सादरीकरण करण्यात आले. प्रदर्शनात लहान गट (इयत्ता ५ वी ते ८ वी) आणि मोठा गट (९ वी ते १२ वी) अशा दोन गटांमध्ये विज्ञान प्रकल्प स्पर्धा, निबंध स्पर्धा, विज्ञान वकृत्व स्पर्धा आणि विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. रयत इंग्लिश मीडियम स्कूल शिरवळ




या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध बक्षिसे पटकावली. लहान गटामध्ये कु.समर्थ पिसाळ या विद्यार्थ्याने प्रकल्प स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला.कुमारी गार्गी देशमुख या विद्यार्थिनी ने निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवला.

तसेच मोठ्या गटात कुमारी आर्या आनंद गुळुमकर या विद्यार्थिनीला निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळाला.शाळेतील विज्ञान शिक्षिका रुपाली योगेश राऊत यांनी प्रकल्प स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच लावण्या ठाकूर, श्रावणी पिसाळ, ओवी घाडगे, वर्षा, मृगनयनी सोनमाळी,चैतन्या गोळे, सिद्धी धुमाळे,सोहम चौरे, मयुरेश पिसाळ स्मित चोबारकर, रुद्र खामकर श्रीतेज साळुंखे या विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा सागर मांढरे रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य आप्पासाहेब देशमुख तसेच स्थानिक स्कूल कमिटीचे सर्व सदस्य ,शिक्षक पालक संघाचे सर्व सदस्य, शाळेच्या पर्यवेक्षिका वासंती घाडगे विज्ञान शिक्षिका रूपाली राऊत व सर्व शिक्षक व पालक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.